संत ज्ञानेश्वर बहुउद्देशीय मंडळ धाबा द्वारा संचालित

# श्री. धाबेकर कला महाविद्यालय

खडकी (चां.), ता. जि. अकोला



# वाचन प्रेरणा दिवस अहवाल

**सत्र २०२०**


डॉ. संगिता लोहकपूरे
प्राचार्य,
श्री. धाबेकर कला महाविद्यालय,
खडकी (चां.) अकोला

प्रा.डॉ. संतोष एस. मिसाळ
श्री. धाबेकर कला महाविद्यालय,
खडकी (चां.) अकोला

Shri Sant Dnyaneshwar Bahuuddeshiya Mandal's

# SHRI DHABEKAR KALA MAHAVIDYALAYA

Khadki (Cha.), Tq. Dist. Akola (M.S.) Mob 9405169511 Email : sdkm233@sgbau.ac.in

*(Affilated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati)* College Code : 233

**Shri Anil Dhabekar**
President

Website :
www.dkmkhadkiakola.org.

**Dr. Sangita Naik (Lohakpure)**
M.P.Ed., Ph.D
**Principal**

Ref. No. DKM - 184/2020

Date : 17.10.2020

प्रति

मा.सहसंचालक

उच्च शिक्षण विभाग

अमरावती

विषय:- **वाचन प्रेरणा दिन** अहवाल स्विकारण्याबाबत..

संदर्भ:१ शासन निर्णय क्रमांक वाप्रेदि-२०२०/प्र.क्र.७०/ भाषा ३

दि. १४/०९/२०२०

२.मा.शिक्षण संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र शासन पुणे यांचे पत्र क्र उशिस/२०२०/वाचन प्रेरणा दिन/मवि १/६३३५ दि २८/०९/२०२०

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयांनुसार भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणुन साजरा करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक वाप्रेदि-२०२०/प्र.क्र.७०/ भाषा३ दि. १४/०९/२०२० अन्वये करण्यात आले आहे.

याच अनुषंगाने आमच्या महाविदयालयात विदयार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी याकरीता विविध कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.करीता वाचन प्रेरणा दिवसाचा अहवाल आपणास सादर करीत आहे. कृपया आपण अहवाल स्विकारवा ही विनंती

Principal
Shri Dhabekar Kala Mahavidyalaya,
Khadki (Cha.), Tq.Dist.Akola

# वाचन प्रेरणा दिवस

**प्रस्तावना :-**

भारताचे जेष्ठ शास्त्रज्ञ आणी माजी राष्टपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून आमच्या महाविदयालयात साजरा केला आहे.आपणास माहीत आहे की,डॉ. कलाम यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू होते. डॉ. कलाम यांच्यामध्ये असणारी दुर्दम्य इच्छाशक्ती, आत्मविश्वास, कणखर मण आणी दिलदार स्वभाव यामुळेच डॉ. कलाम यांनी देशाच्या युवा पिढीला आपल्या विचारांनी आणी कर्तुत्वाने भारावून टाकले होते. भारत नक्कीच महासत्ता बनेल अशा विश्वास त्यांनी लिहीलेल्या अनेक पुस्तकामधुन येणा-या काळात भारत कसा महासत्ता म्हणून पूढे येणार आहे.भारताची खरीशक्ती हि युवा शक्ती कशी असणार आहे हे त्यांनी सांगीतले आहे.डॉ. कलाम यांचे लेखन स्फुर्तीदायी आहे.त्यामुळे महाविदयालयात शिकणा-या विदयार्थ्यानी डॉ.कलाम यांची पुस्तके वाचावीत त्याचबरोबर इतर साहित्याचेही जास्तीत जास्त वाचन करावे. आणी विदयार्थ्यानमध्ये वाचनाची आवड निमार्ण व्हावी या उददेशांने वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन केले आहे.

**वाचन प्रेरणा दिना मागची भूमिका :-**

आमच्या महाविदयालयातील अंवातर वाचनाची आवड निर्माण करण्याचे उदिष्ट वाचन प्रेरणा दिनाचे आहे. आजच्या विदयार्थ्याचे अभ्यासाच्या व्यतिरिक्त अंवातर वाचन होणे आवश्यक आहे. अंवातर वाचनामुळे विदयार्थ्याना अनेक संदर्भ मिळतात.विदयार्थ्यांचे आकलन शक्ती वाढते तसेच इंतरावर आपल्या ज्ञानाचा प्रभाव टाकण्यासाठी अंवातर वाचनाचा उपयोग होतो. विदयार्थ्यांचा व्यक्तिगत विकास होतो.म्हणून आमच्या महाविदयालयात हा उपक्रम राबविला जातो.

**वाचन प्रेरणा दिवस:-**

आमच्या महाविदयालयात ख्यातनाम अनुवैज्ञानिक ते देशाचे राष्ट्पती असा प्रेरणादायी प्रवास असणारे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोबर रोजी  प्राचार्य डॉ.संगीता लोहकपुरे यांच्या मार्गदर्शनात आणी प्रा. राहुल घुगे व प्रा.डॉ. संतोष मिसाळ यांच्या उपस्थित प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.संतोष मिसाळ यांनी भारताचे माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे जीवनशैली , अनुवैज्ञानिक ते राष्ट्रपती असा प्रवास होता.या पदावर कार्यरत असताना आपल्या कामाचा ठसा उमठविला असे मत व्यक्त केले. तसेच

प्रा.राहुल घुग` यांनी भारताचे राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस साजरा करताना,विदयार्थ्यांनी विदयार्थी जीवनामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी वाचन प्रेरणा दिवसाचे औचित्या साधुन ग्रंथवाचन,संविधान वाचन,महात्मा गांधी पुस्तकांचे वाचन, वृत्तपत्र वाचन अशा प्रकारे विदयार्थ्यांनी नेहमी वाचन करावे.व आपल्या जीवनशेली व व्यक्तीगत विकास साध्य करुन घ्यावा असे प्रतिवादन केले. तसेच या कार्यक्रमांचे अध्यक्ष प्राचार्य संगिता लोहकपुरे यांनी अध्यक्षीय भाषण करतांना डॉ. कलाम यांचे विचार विदयार्थ्यानी आत्मसात करावे असे आव्हान केले.

**वाचन कट्टयाची स्थापना:-**

आमच्या महाविदयालयात राष्ट्रपती डॉ.कलाम यांचा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणुन साजरा झाला.वाचन प्रेरणादिनी महाविदयालयाच्या विद्यार्थ्यांकरीता डॉ. कलाम वाचन कट्टयांची स्थापना करण्यात आली.प्रा.रेखा अढाव यांनी वाचन कट्टयाची संकल्पना स्पष्ट केली.वाचन कट्ट ा अंतर्गत विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील प्रेरणादायी पुस्तके वाचायला मिळावीत विद्यार्थ्यांचे भावविश्व , विचारविश्व,समृदध व्हावे करिता वाचनकला उपक्रम हा अभ्यासपुरक असल्यामुळे त्यांची अनिवार्यता महत्त्वाची अभ्यासक्रमा व्यतिरिक्त अंवातर वाचनाने विद्यार्थी अभ्यासक्रम समजावून घेण्यास समर्थ होऊ शकतात हा विद्यार्थीभिमुख उपक्रम असल्याचे मत प्रा.संतोष मिसाळ यांनी व्यक्त केले.प्राचार्य डॉ.संगिता लोहकपुरे यांनी विद्यार्थ्यांनी प्रामाणिक मेहनत करुन मानवकल्याणासाठी आपल्या क्षमताचा वापर करावा असे सांगीतले प्रा.राहुल घगे यांच्या मते, मानवी जीवनामध्ये समाधान समृदधी अभय,सहअस्तित्व प्रमाणित करण्यासाठी आत्मचरीत्रे वाचने आणि त्यातुन प्रेरणा घेऊन समाज कल्याणाकरीता कार्य करणे अपेक्षित असल्याचे सांगीतले.वाचाल तर वाचाल ही म्हण विदयार्थ्यांनी आत्मसात करावी. वाचन कटटयाचा अध्यक्ष कु. पायल चव्हाण उपाध्यक्ष कल्याणी लुले ,सदस्य कु.शुभांगी कांबळे,आहेत.या विदयार्थ्यांनी वाचन कटटा महाविदयालयात यशस्वीपणे राबविलेला आहे.

**डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम पुस्तक भेट :**

डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम पुस्तक भेट योजना या दिनानिमीत्ताने आयोजीत करण्यात आली.या योजने अंतर्गत कोणताही व्यक्ती महाविदयालयाला किंवा ग्रंथालयाला पुस्तक भेट देऊ शकेल.वाचन प्रेरणा दिवसाच्या निमित्ताने महाविदयालयात लोक सहभागातुन विदयार्थ्यांना पुस्तक वाटप केले.प्रा.डॉ.संतोष मिसाळ यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांनी लिहीलेल्या किमान एका तरी पुस्तकाचे वाचन विदयार्थ्यांनी करावे असे प्रतिपादन केले.प्रा.डॉ.संगीता लोहकपुरे यांनी अध्यक्षीय भाषणात पुस्तक भेट ही योजना यशस्वीपणे राबविलेली आहे.विदयार्थ्यांनी पुस्तकाचे वाचन नेहमी करावे आणि आपल्या व्यक्तीमत्वाचा विकास करावा असे प्रतिपादन केले.

**चर्चा सत्राचे आयोजन :**

आमच्या महाविदयालयात डॉ.अब्दुल कलाम यांच्या पुस्तकावर चर्चा सत्राचे आयोजन केले.या चर्चा सत्रात चर्चा करण्याकरीता प्रा.राहुल घुगे उपस्थित होते.त्यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या पुस्तकावर विदयार्थ्यांशी संवाद साधला आणि विदयार्थ्यांनी सुदधा चांगला प्रतिसाद दिला .





